पुणे मुंबई हायपरलूप प्रकल्पास "पायाभूत सुविधा प्रकल्प" म्हणून घोषित करण्यास मान्यता देणे व डीपी वर्ल्ड एफझेडई व हायपरलूप टेक्नॉलॉजीज्, आयएनसी यांच्या भागीदारी समुहास "मुळ प्रकल्प सूचक" म्हणून घोषित करण्यास मान्यता देणे.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : पीआरडी-३३१८/प्र.क्र.१०३/नवि-७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २० सप्टेंबर, २०१९.

प्रस्तावना :-

पुणे मुंबई हायपरलूप प्रकल्प हा पुणे व मुंबई या दोन महानगरांना हायपरलूप तंत्रज्ञानाद्वारे जोडणारा प्रस्तावित अत्याधुनिक वाहतूक प्रकल्प राबविण्यात उद्योजकांनी स्वारस्य दाखविले आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असलेल्या सदर प्रकल्पाचे तांत्रिक व खर्चाचे मूल्यमापन चोखपणे होणेसाठी महाराष्ट्र पायाभूत सुविधा विकास सक्षम प्राधिकरण अधिनियम २०१८ नुसार हा प्रकल्प 'स्विस आव्हान पद्धती'/ 'Swiss Challenge Method' द्वारे विकसित करणे प्रस्तावित आहे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सादर केलेल्या सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. महाराष्ट्र पायाभूत सुविधा विकास सक्षम प्राधिकरण (महाआयडिया) यांनी शिफारस केलेल्या सदर प्रकल्पाचा प्रस्ताव पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने राज्य शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. पुणे-मुंबई हायपर लूप प्रकल्पाला पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने जमीन उपलब्ध करून द्यावयाची असून सदर प्रकल्पाचे कोणतेही दायित्व राज्यशासनावर येणार नाही. या पार्श्वभूमीवर सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

०२. शासन निर्णय :-

पुणे-मुंबई दरम्यान हायपर लूप प्रकल्प पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्याच्या अनुषंगाने प्राधिकरणाने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

(१) पुणे-मुंबई हायपर लूप प्रकल्पाला पायाभूत सुविधा प्रकल्प म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(२) डी.पी.वर्ल्ड एफझेडई व हायपर लूप टेक्नॉलॉजिज आय.एन.सी. यांच्या भागीदारी समुहाला (कन्सोर्टीयम) मूळ प्रकल्प सूचक म्हणून महाराष्ट्र पायाभूत सुविधा सक्षम प्राधिकरण नियम ,२०१८ मधील नियम ५ (१-अ) नुसार हमीपत्र देण्याच्या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

(३) सदर प्रकल्पाच्या जमीन/भूसंपादन अथवा इतर बाबींचा कुठलाही आर्थिक भार राज्य शासनावर येणार नाही, याची खबरदारी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने घ्यावी.

सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौ.सं.क्र.२४२/व्यय-३ दिनांक २०.०९.२०१९ अन्वये प्राप्त अभिप्राय व मा. मंत्रीमंडळाने दि. ३०.०७.२०१९ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०९२०२०२०५०६२२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2019.09.21 11:47:09 +05'30'

(विजय चौधरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. मा. राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
६. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
८. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. अपर मुख्य सचिव नियोजन विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
११. प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१२. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१३. सचिव (विशेष प्रकल्प), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१४. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
१५. जिल्हाधिकारी, पुणे.
१६. पोलिस आयुक्त, पुणे.
१७. पोलिस आयुक्त, पिंपरी-चिंचवड.
१८. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे.
१९. आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड
२०. महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकण, औंध, पुणे.
२१. महाव्यवस्थापक, पुणे महानगर परिहवन महामंडळ मर्या. पुणे.
२२. संचालक, नगर रचना, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे.
२३. सह सचिव, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२४. कार्यासन अधिकारी (नवि-२२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५. निवड नस्ती (नवि-७).